NUHM recruitment advertisement 2021

| | | |
|---|---|---|
| | राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान<br>एकात्मिक आरोग्य सोसायटी महानगरपालिका अमरावती | NATIONAL HEALTH MISSION, MAHARASHTRA<br>NHM<br>राष्ट्रीय आरोग्य अभियान<br>महाराष्ट्र |

# जाहिरात 2021

अमरावती महानगरपालिका, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत खालिल पदे ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात 11 महिन्यांच्या करार तत्वावर भरावयाची आहेत. करीता इच्छुक उमेदवारांनी खालिलप्रमाणे पदनिहाय शैक्षणिक अर्हता धारक करीत असल्यास सर्व शैक्षणिक प्रमाणपत्रासह अर्ज सादर करावेत.

| अ. क्र. | पदनाम | किमान शैक्षणिक अर्हता | प्रवर्ग | वयोमर्यादा | मानधन |
|---|---|---|---|---|---|
| 1 | पूर्णवेळ वैद्यकीय अधिकारी | 1) MBBS<br>2) Registration with MMC | अ.जा. – 2<br>अ.ज. – 1<br>वि.जा. (अ) – 1<br>इ.मा.व. – 3<br>खुला – 2<br>इ.डब्ल्यु.एस. - 1 | खुल्या प्रवर्गास 38 वर्ष व राखीव प्रवर्गास 43 वर्ष वयोमर्यादा राहील. (उपरोक्त वयोमर्यादेपेक्षा जास्त वय असल्यास आवश्यतेनुसार विचार करण्यात येईल.) | 60000/- |
| 2 | स्टाफ नर्स | 1) 12वी (सायन्स)<br>2) जी.एन.एम. कोर्स/ बि.एस.सी. नर्सिंग शासनमान्य संस्थेमधुन उत्तीर्ण<br>3) Registration with MNC | अ.ज. – 1<br>वि.जा.(अ) – 1<br>इ.मा.व. – 2<br>खुला – 1<br>इ.डब्ल्यु.एस. - 1 | खुल्या प्रवर्गास 38 वर्ष व राखीव प्रवर्गास 43 वर्ष | 20000/- |
| 3 | लॅबटेक्रिशियन (Laboratory Technician) | 1) बी.एस.सी. पास<br>2) डीएमएलटी शासनमान्य संस्थेमधुन उत्तीर्ण | वि.जा.(अ) – 1<br>इ.मा.व. – 1 | खुल्या प्रवर्गास 38 वर्ष व राखीव प्रवर्गास 43 वर्ष | 17000/- |
| 4 | फार्मासिस्ट (Pharmacist) | 1) डी. फार्म. शासनमान्य संस्थेमधुन उत्तीर्ण | इ.मा.व. – 1 | खुल्या प्रवर्गास 38 वर्ष व राखीव प्रवर्गास 43 वर्ष | 17000/- |

NUHM recruitment advertisement 2021

सर्वसाधारण सुचना:-

1) अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीनेच www.amtcorp.org या संकेत स्थळावर स्विकारण्यात येईल. ऑफलाईन केलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

2) वयोमर्यादा ही जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिनांकास गणले जाईल.

3) जाहिराती मधील पदसंख्या, आरक्षण, नियुक्तीच ठिकाण या मध्ये बदल होऊ शकतो तसेच विहित केलेली निवड प्रक्रिया, मुलाखती, प्रतिक्षा यादी तसेच भरती प्रक्रिया या मध्ये कोणत्याही टप्प्यावर, कोणतेही कारण न देता रद्द अथवा बदल करण्याचे अधिकार मा.उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला मंडळ अकोला यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहे.

अर्ज सादर करण्याची अंतिम दिनांक :-30/04/2021

पात्र, अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे :-05/05/2021

आक्षेप सादर करण्याचा अंतिम दिनांक :-07/05/2021

(आक्षेप असल्यास प्रत्यक्ष कार्यालयीन वेळेत अंतिम दिनांकाच्या सादर करावेत)

अटी व शर्ती:

1. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

2. अर्जदार हा संबंधित पदासाठी शाररीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा व अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

3. प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक राहील.

4. अर्जामध्ये उमेदवार ज्या पदाकरीता अर्ज करणार आहे त्याअनुषंगाने संपुर्ण माहिती भरावी व त्याअनुषंगाने सर्व आवश्यक शैक्षणिक कागदपत्रे अपलोड करावेत. तसेच त्रुटी असलेल्या अर्जाचा तसेच कागदपत्रे अर्जासोबत न जोडल्यास अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही व त्याबाबत आपले कोणतेही निवेदन विचारात घेतले जाणार नाही.

5. मुलाखती करीता निवड करण्यात आलेल्या उमेदवाराला सोबतच्या नमुन्यातील परीपूर्ण भरलेला अर्ज आणि खालील कागदपत्रांसह उमेदवाराने मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे. (नुकतेच काढलेले पासपोर्ट साईज कलर फोटो, जन्म तारखेचा दाखला, शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र व मार्कशीट, (शेवटच्या वर्षाची गुणपत्रिका आवश्यक), एम.एस.सी.आय.टी. प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, अधिवास व राष्ट्रीय प्रमाणपत्र, महाराष्ट्र मेडीकल कौन्सिल नोंदणी/नूतनीकरण प्रमाणपत्र (वैद्यकीय अधिकारी पदासाठी), महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल नोंदणी / नूतनीकरण प्रमाणपत्र (Staff Nurse, LT पदासाठी), मुलाखतीच्या अनुषंगाने इतर कागदपत्रे यांच्या मुळ व सत्य प्रत साक्षांकित प्रतीसह सोबत ठेवावे.

6. राखीव प्रवर्गा अंतर्गत नियुक्ती झाल्यास जातीचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

7. मागास वर्गीय संवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या पदावर इतर संवर्गातील उमेदवाराची तात्पुरत्या स्वरुपात निवड करण्यात येईल. (मा.सहसंचालक, आरोग्य सेवा, एनयुएमएम पुणे यांचे पत्र क्र. जा.क्र.ससंआसे/एनयुएचएम/कक्ष-7ब/न.क्र.46/48661/08 दिनांक:- 05/11/2008 अन्वये)

8. अनुभवाच्या बाबतीत केवळ शासकिय, स्थानिक स्वराज्य संस्था, व राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असणारा अनुभव ग्राह्य धरला जाईल.

9. सदर्हूपदे NUHM प्रकल्पा अंतर्गत असल्याने त्याचा अमरावती महानगरपालिका आस्थापनेशी कोणताही प्रकारचा संबंध नाही. तसेच निवड होणाऱ्या उमेदवारास अमरावती महानगरपालिका तसेच राज्य शासनाच्या आस्थापनेवरील कोणत्याही पदावर हक्क सांगणे कामी कोणत्याही न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही.
10. निवड होणाऱ्या उमेदवारांना 11 महिन्यांकरीता नियुक्ती देण्यात येईल. सदर्हू पदे निव्वळ कंत्राटी पध्दतीने केवळ प्रकल्प कालावधी पुरते भरावयाचे असुन प्रकल्प बंद होताच सदरील पदे आपोआप संपुष्टात येतील. तसेच नियुक्तीच्या कालावधीमध्ये उमेदवाराचे काम समाधानकारक न आढळल्यास तसे कोणत्याही स्वरुपाची गैरवर्तणुक केल्यास कोणतेही कारण न देता नियुक्ती रद्द करण्यात येईल.
11. उमेदवारांनी कोणत्याही प्रकारचा राजकीय दबाव आणल्यास त्यांना मुलाखतीस व नियुक्तीस अपात्र ठरविण्यात येईल.
12. अर्जदाराला सोईनुसार ठिकाण बदलवून मिळण्याची मागणी करता येणार नाही.
13. सदर जाहिरात अमरावती महानगरपालिका नोटीस बोर्ड आणि अमरावती महानगरपालिकेची वेबसाईट www.amtcorp.org या संकेत स्थळांवर उपलब्ध असुन सदर्हू भरती प्रक्रिये संदर्भात अधिक माहिती सदर्हू संकेत स्थळांवर प्रसिध्द करण्यात येईल.
14. प्राप्त व अपात्र उमेदवारांची यादी महानगरपालिकेच्या सुचना फलकावर लावण्यात येईल. सदरची यादी पाहण्याची जबाबदारी ही उमेदवारांची राहील, व्यक्तीश: या कार्यालयाकडून कोणालाही माहिती देण्यात येणार नाही. अर्जाच्या छाननी अंती पात्र ठरणा-या उमेदवारांना मुलाखती साठी प्रवेश देण्यात येईल.
15. मा. आयुक्त (कु. क.) वसंचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, महाराष्ट्र, मुंबई यांचे पत्र क्र. जा. क्र. राआसो/NUHM/स्टाफ मार्गदर्शन/14981-15248/2013-14 दिनांक 5 जून 2015 च्या पत्रान्वये राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (NUHM) अंतर्गत कंत्राटी अधिकारी / कर्मचारी भरणेबाबत सुधारीत मार्गदर्शक सुचनेनुसार:-
A. जास्त उमेदवार आल्यास छाननी अंती एका पदास दोन उमेदवार या प्रमाणे पदानुसार पदवी/ पदविका/जीएनएम/एएनएमकोर्स/फार्मासिस्ट/लॅबटेक्निशियन इत्यादी त्या शैक्षणिक पात्रतेच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेतील गुणवत्तेनुसार मुलाखतीसाठी गुणांचा कट ऑफ लावण्यात येईल.
B. एकूण 100 गुणांची निवड प्रक्रिया राहील.
C. यामध्ये पदवी/पदविका/जीएनएम/फार्मासिस्ट/लॅबटेक्निशियनच्या शेवटच्या वर्षाच्या गुणानुसार जास्तीत जास्त 80 गुण देण्यात येतील.
अ) शेवटच्या वर्षाचे गुण ग्राह्य धरले जातील.
ब) अतिरिक्त शैक्षणिक पात्रता असल्यास शासनाचे मार्गदर्शक सुचनेनुसार अतिरिक्त जास्तीत जास्त 5 गुण देण्यात येतील.
क) 5 गुण अनुभवास आधारित राहील. दोन वर्षा पेक्षा कमी अनुभव असल्यास 0 गुण, 2 वर्षे अनुभव असल्यास 3 गुण आणि पुढे प्रत्येक वर्षासाठी एक याप्रमाणे जास्तीत जास्त 5 गुण राहतील. अनुभवाच्या बाबतीत फक्त शासकिय, निमशासकिय, स्थानिक स्वराज्य संस्था अथवा राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत असणारा अनुभव ग्राह्य धरला जाईल.
ड) 10 गुण विषय ज्ञानासाठी (मुलाखतीसाठी) देण्यात येतील.
इ) विषय ज्ञानासाठी 1:2 याप्रमाणे Cut Off लावण्यात येईल.
ई) कोविड-19 चा प्रादुर्भाव पाहता मुलाखत रद्य होण्याची शक्यता असल्याने त्या बाबत निर्णय

झाल्यास वरील नमुद केल्याप्रमाणे मेरिट लिस्टनुसार निवड करण्यात येईल.

16. उच्च शैक्षणिक अर्हताधारकास व अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

17. शासकिय सेवानिवृत्त अधिकारी यांचे करीता वयोमर्यादा 62 वर्षे असेल तसेच अनुभवास प्राधान्य असेल. वर्ग 3 व वर्ग 4 च्या पदावरुन निवृत्त झालेले कर्मचारी कंत्राटी पदावर अर्ज करण्यासाठी दि.17/12.2016 रोजीच्या शासननिर्णयाव्दारे अपात्र आहेत.

18. सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांचे विरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कार्यवाही चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा कोणत्याही प्रकारे फौजदारी प्रकरण नसावे.

19. सेवानिवृत्त उमेदवारांना मानधन शासन निर्णय क्रं. संकिर्ण - 2715/प्र.क्र./100/13 दि.17.12.2016 नुसार अदा करण्यात येईल.

20. सदरभरती प्रक्रिया कोविड-19 संसर्ग साथरोग परिस्थिती मध्ये होत असल्यामुळे व आपत्ती व्यवस्थापन कायदा लागु करण्यात आलेला असल्याने ऑनलाईन अर्जामध्ये सादर केलेल्या माहितीच्या आधारे निवड करण्यात येणार आहे. दरम्यान उमेदवाराने चुकिची माहिती सादर केल्यास, कोणतीही माहिती दडवुन ठेवल्यास, दबाव तंत्राचा वापर किंवा अनुचित मार्गाचा अवलंब केल्याचे आढळुन आल्यास कोणत्याही टप्प्यावर त्यांची उमेदवारी/नियुक्ती कोणतीही पुर्वसुचना न देता रद्य करण्यात येईल.

21. शासन निर्णय दि.13 जानेवारी 2009 नुसार खुला (अमागास), अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती ही प्रवर्ग वगळता इतर मागास प्रवर्गातील उमेदवारांना आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी दि.31 मार्च 2020 पर्यंत वैध असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉनक्रिमीलेअर) प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

22. नियुक्त झालेल्या उमेदवारास कामावर रूजू होतांना विहित नमुन्यामध्ये रु.100/- च्या स्टॅम्प पेपरवर NUHM अंतर्गत सेवेच्या अटी व शर्तीवर करारनामा करुन द्यावा लागेल.

सदस्य सचिव
तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी,

उपाध्यक्ष
तथा उपायुक्त

# अर्जाचा नमुना

प्रति,
मा.आयुक्त
अमरावती महानगरपालिका, अमरावती

पदाचे नांव :- ________________________________

1) उमेदवाराचे नांव :- ---------------------------------------------
2) उमेदवाराचे वडीलांचे/पतीचे संपुर्ण नांव :------------------------------------------
3) जन्म तारीख :- वर्ष महिना दिवस
अक्षरी : ------------------------------------------------------------------
वय:- वर्ष पुर्ण महिने पुर्ण दिवस
(जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिनांकास गणना करावी)
4) कायम निवासाचा पत्ता: ---------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------
5) अर्जदाराकडे रहिवाशी प्रमाणपत्र आहे: - होय/नाही
6) अर्जदाराकडे जातीचे प्रमाणपत्र आहे : - होय/नाही
जातीचा प्रवर्ग:- -------------------
जातीचे नांव:- ---------------------
अर्ज सादर करीत असलेल्या जातीचा प्रवर्ग :- ---------------
7) अर्जदार विवाहित आहे किंवा नाही : - होय/नाही
8) शैक्षणिक पात्रता :-

| अ. क्र. | धारण केलेली पदवी/पदविका अर्हतेचा तपशील | बोर्डाचे/विद्यापिठाचे नांव | उत्तीर्ण वर्ष | अंतिम वर्षाचे मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

9) अनुभव :- अनुभवाची साक्षांकित प्रत जोडावी

| अ. क्र. | काम केलेल्या कार्यालयाचे नांव व पत्ता | धारण केलेले पद | कालवधी | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वर्ष | महिने | दिवस |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

10) अर्जासोबत खालिल साक्षांकित प्रति जोडल्या आहेत (सर्व कागदपत्रांवरती पृष्ठ क्रमांक नमुद करावा)

1) -------------------------------------------------- 2) --------------------------------------------------

3) -------------------------------------------------- 4) --------------------------------------------------

5) -------------------------------------------------- 6) --------------------------------------------------

7) -------------------------------------------------- 8) --------------------------------------------------

मी अर्जदार प्रमाणित करतो/करीतो की, मी ------------------------------ या पदाकरीता अर्ज केलेला असून मी जाहिरात योग्य रितीने वाचली असून मला जाहिरातीमधील सर्व अटी व शर्ती मान्य आहेत. तसेच अर्जात नमुद केलेली माहिती खोटी आढळून आल्यास माझी उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात आल्यास माझा कोणताही हक्क राहणार नाही. तसेच नियुक्ती अधिकारी जो निर्णय देईल तो मला मान्य राहील.

उमेदवाराची स्वाक्षरी

उमेदवारांचे संपुर्ण नांव :- --------------------------

--------------------------------------------------------------------------------------------------------------

NUHM recruitment advertisement 2021

लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन

नमुना अ

मी, श्री/श्रीमती/कुमारी ------------------------------------- श्री.----------------------------------- यांचा/यांची/मुलगा/मुलगी/पत्नी, वय ---------- वर्ष, राहणार ---------------------------------------------------- याव्दारे पुढिल प्रमाणे असे जाहिर करतो/करीते की, (1) मी -------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे. (2) आज रोजी मला ----- इतकी हयात मुले आहेत, त्यापैकी दिनांक 28 मार्च 2005 यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ----- आहे. (3) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक 28 मार्च 2006 व तदनंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

वर नमुद केलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे सत्य व अचुक आहे मी असेही प्रमाणीत करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळुन आल्यास नोकरी गमविण्यास व त्या अनुषंगाने होणाऱ्या कार्यवाहीस पात्र व बांधिल राहील.

ठिकाण :-

दिनांक :-

उमेदवाराची स्वाक्षरी

उमेदवारांचे संपुर्ण नांव :- --------------------------

(अविवाहित असल्यास तसे नमुद करुन प्रतिज्ञापत्रावर स्वाक्षरी करावी)